# विद्यार्थ्यांनी असाध्य गोष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी: डॉ ज्ञानोबा दराडे

## रौप्य महोत्सवी बाल झुंबड- २०२५ चा शानदार शुभारंभ

**अंबाजोगाई** । प्रतिनिधी

कोणतीही गोष्ट साध्य किंवा असाध्य नसते. त्यामुळे कुठलीही असाध्य गोष्ट साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज असल्याचे मत स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय तथा वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्र विभाग प्रमुख डॉ ज्ञानोबा दराडे यांनी व्यक्त केले. ते प्रियदर्शनी क्रीडा , सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने आयोजित बाल झुंबड- २०२५ च्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड या उपक्रमाचे हे २५ वे म्हणजेच रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या संकल्पनेतून अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. कोव्हिडंचा काळ सोडला तर हा उपक्रम अखंडपणे चालू आहे. २०२५ च्या बालझुंबड उपक्रमाच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ ज्ञानोबा दराडे , उद्घाटन दैनिक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते, वसंतराव काळे विद्यालयाचे मुख्याध्यापक केदार सर, प्राचार्य रेंजू आरचंद्रन , प्राचार्य तरके सर, मुख्यध्यापक आनंद टाकळकर, आप्पा चव्हाण, विनायक मुंजे, विजय रापतवार, मुख्याध्यापिका श्रीमती अंजली जोशी तसेच परीक्षक म्हणून श्रीमती ज्ञानेश्वरी



पवार, शीतल फुंदे, संभाजी गित्ते, कु ज्योती मुरकुटे, यांच्यासोबतच इक्बाल विद्यालयाचे अब्दुल मुजाहेद व पुसरेकर सर हे उपस्थित होते. यावर्षीच्या बालझुंबड उपक्रमाच्या रौप्य महोत्सवी वर्षाची सुरुवात सावित्रीबाई फुले व साने गुरुजींच्या प्रतिमांचे पूजन करून तसेच मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य विनायक मुंजे यांनी केले.बाल झुंबड हे अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांचे एकत्रित स्नेह संमेलन असल्याचे मुंजे यांनी सांगितले. मागील चोवीस वर्षापूर्वी प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी यांनी बाल झुंबड हा उपक्रम सुरू केला आणि त्या उपक्रमाचे आज रौप्यमहोत्सवी वर्ष असून या उपक्रमाची परंपरा मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी हे पुढे चालवीत आहेत. या उपक्रमात दरवर्षी नाविन्यपूर्ण स्पर्धा आणण्याचा प्रयत्न मंडळाच्या वतीने करण्यात येत असल्याचे प्राचार्य विनायक मुंजे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. याप्रसंगी वसंतराव काळे विद्यालयाचे प्राचार्य केदार सरांनी बालझुंबड या उपक्रमाला आपल्या शुभेच्छा दिल्या.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालय मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने अभिवादन



**किल्ले धारूर** । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये थोर समाजसुधारक आद्य स्त्रि. शिक्षणाचा प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. महिलांना शिक्षण मिळाले पाहिजे त्यासाठी कठोर परिश्रम करून मुलींना शिक्षित करण्याचे महान कार्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विनायक कापावार, सदस्य प्रा. नागोराव वाघमारे, डॉ. विजयकुमार कुंभारे, डॉ. नितीन कुंभार यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८/ २०२५**
**ॲड. एस. एस. उबाळे यांचे मार्फत**
**मारुती व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी, **नरसु बाबु झोडगे**, हे दिनांक **१६/११/२०१०** रोजी कानडीघाट, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी,

१. मारुती पि. नरसु झोडगे, वय ७२ वर्षे, धंदा- शेती, रा. कानडीघाट, ता. जि. बीड ह. मु. विदया नगर (पश्चिम), बीड ता. जि. बीड

२. निलावती भ्र. पोपट माटकर, वय ६७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कानडीघाट, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे **नरसु बाबु झोडगे**, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १०/०२/२०२५ ही आहे.**

आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक — शिक्का — (स्वाक्षरीत) अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड



*कै. बाबासाहेब वराट सार्वजनिक वाचनालय बराहाणपुर याच्या विदयामाने आयोजित केलेलया कार्य करमास सुमनबाई वराट वचछलाबाई पवार सुमनबाई कसबे आसराबाई शेडगे सत्यभामा बाई वराट याचयासह अनेक महिला उपस्थित होतया आभार प्रदर्शन सुमनबाई वराट यांनी केले.*

## पांगरवावडी येथील मसनजोगी वस्तीत सावित्रीवाई फुले यांची जयंती साजरी

**बीड** । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पांगरबावडी येथे धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने मसणजोगी वस्ती येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.



भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज, ३ जानेवारी जयंतीदिन. स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्रीबाईंना त्यांच्या १९२ व्या जयंती दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले व सर्वांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे कठीण कार्य ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी केले. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील बुधवार पेठेत मुलींची पहिली शाळा काढून या दाम्पत्याने प्रथम शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. काही धर्ममार्तंडांनी ‘धर्म बुडाला’ अशी ओरड केली व सावित्रीबाईंवर धर्मबुडवी म्हणून ते शेणमाती, दगड फेकू लागले. तरीसुद्धा त्या मागे हटल्या नाहीत. अस्पृश्यांना शिकविल्यामुळे सनातनी मंडळी जास्तच चिडली.

## शांताई अर्बन मध्ये दिनदर्शिका प्रकाशन सोहळा खातेदारांच्या उपस्थितीत संपन्न

**बीड** । प्रतिनिधी

दरवषी प्रमाणे या ही वर्षी शांताई अर्बन दिनदर्शिका प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता प्रकाशनासाठी सर्व खातेदार संचालक पिग्मी एजंट सभासद उपस्थित होते. सामान्य माणसापर्यंत दिनदर्शिका पोहचवण्याचां मानस आहे असे मत शांताई अर्बन चे अध्यक्ष डॉ.डी बी शिंदे सर यांनी मांडले तसेच छोट्या उदयोग धंद्यांना शांताई अर्बन मुळे मदत होते



असे मत शांताई अर्बन चे पहिले खातेदार घाडगे अमोल यांनी व्यक्त केले तसेच दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यासाठी दैनिक कार्यारंभ च्या जाहिरात विभाग प्रमुख श्वेताबरी घाडगे मॅडम ,डॉ प्रियंका शिंदे मॅडम ,तेजस्विनी ग्रुप च्या संचालिका सोनल पाटील , भारती मुने, डफाळ दैवशाला ,लिंबेकर ताई तसेच आवर्जून उपस्थित असलेले डॉ. अनंत मुळे सर , डॉ.संतोष शिंदे सर,डॉक्टर अमोल गित्ते सर डॉ.देशपांडे सर , हिरकणी हॉस्पिटल चे डॉ जयदत्त घोळवे सर व डॉ निलेश घोळवे सर ,ॲड पांडव सर,कुंडलकर सर घाडगे अमोल ,सतीश गलधर दिनेश कांनतोडे बहिरवाल इत्यादी अनेक खातेदारांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी शांताई अर्बन च्या नवीन नवीन उपक्रमाबद्दल कौतूक केले.

## वडवणीत शाकंभरी पौर्णिमेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**वडवणी** । प्रतिनिधी

वडवणी शहरामध्ये शाकंभरी पौष पौर्णिमेनिमित्त श्री.श्री. श्री. दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या प्रेरणेतून व ह.भ.प.प्रेममूर्ती नामदेव महाराज लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी शहरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि भव्य कीर्तन महोत्सव तथा अखंड हरिनाम सप्ताह याचे आयोजन करण्यात आले असून बाचा आरंभ सोमवार दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी होणार असून याची सांगता शाकंभरी पौष पौर्णिमा दिनी सोमवार दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. यादरम्यान विविध धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांची मोठी रेलचेल राहणार असून तरी या अध्यात्मिक पर्वणीचा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमांमध्ये पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम पाठ, ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व नंतर हरिजागर होईल.

## नमुना- इ- ४
### ( नियम १८ पहा )

**निवडणूक निर्णय अधिकारी:-** श्री. व्ही. एस. जगदाळे
**सहकारी संस्थेचे नाव:- राजर्षी शाहू तालुका ग्रामिण नागरी सहकारी पतसंस्था म. केज, ता. केज, जि. बीड**

पदनाम:- **सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. केज, जि. बीड**
अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक- १४/०६/२०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ च्या नियम१८ प्रमाणे अधिकाराचा वापर करून आणि मा .राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरीता मी व्ही. एस. जगदाळे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, सा, केज, जि.बीड आणि मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी बीड व मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने राजर्षी शाहु तालुका ग्रामिण नागरी सहकारी पतसंस्था म. केज, ता. केज, जि. बीड म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करून दि. ०६/०१/२०२५ पासून जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियत करीत आहोत.

### अनुसूची

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | | निवडणुक कार्यक्रम जाहिर करण्याचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | मिळालेल्या नाम-निर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिद्धीचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | छाननीनंतरच वैघ नामनिर्देशन पत्राचा यादीचा प्रसिद्धीचा दिनांक | ज्या दिनाकांपर्यत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिद्धी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदार घेण्यात येईल ती दिनांक ती वेळ व ते ठिकाण | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | संस्थेच्या क्रियाशील सभासदांतून निवडलेले (सर्वसाधारण गटातून) | ०७ | दि. ०६/०१/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.०६/०१/२०२५ ते दि.१०/०१/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०६/०१/२०२५ ते दि.१०/०१/२०२५ जसे अर्ज प्राप्त होतील त्या प्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१३/०१/२०२५ सकाळी ११.०० पासुन छाननी संपेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०१/२०२५ सकाळी ११.०० वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०१/२०२५ ते दि.२८/०१/२५ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२९/०१/२०२५ सकाळी ११.०० वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक ०९/०२/२०२५ वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० पर्यंत स्थळ नंतर घोषीत केले जाईल | दिनांक ०९/०२/२०२५ मतदान संपल्यावर लगेच स्थळ नंतर घोषीत केले जाईल | दिनांक ०९/०२/२०२५ मतमोजणी संपल्यानंतर लगेच स्थळ नंतर घोषीत केले जाईल |
| २ | अनुसूचित जाती / जमाती सभासदांसाठी (राखीव) | ०१ | | | | | | | | | | |
| ३ | महिलांसाठी (राखीव) | ०२ | | | | | | | | | | |
| ४ | इतर मागास प्रवर्ग (राखीव) | ०१ | | | | | | | | | | |
| ५ | भटक्या विमुक्त जाती / जमाती व विशेष मागास प्रवर्ग (राखीव) | ०१ | | | | | | | | | | |
| | एकूण | १२ | | | | | | | | | | |

वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था. ता. केज, जि. बीड, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या जवळ, कळंब रोड, केज, ता. केज, जि. बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

स्वाक्षरीत/-
(व्ही. एस. जगदाळे)
निवडणुक निर्णय अधिकारी
राजर्षी शाहू तालुका ग्रामिण नागरी सहकारी पतसंस्था म. केज, ता. केज, जि. बीड

स्वाक्षरीत/-
(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

स्वाक्षरीत/-
(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## थोडक्यात

### हीना सय्यद यांची कॅनल इन्स्पेक्टर पदी निवड

**बीड । प्रतिनिधी**



नाळवंडी येथील हिना सलीम सय्यद यांची २०२३-२०२४ लां आरोग्य विभागा मार्फत झालेल्या परीक्षेत शिपाई पदासाठी निवड झाली होती. सध्या त्या जिल्हा रुग्णालय बीड येथे कार्यरत होत्या. डिसेंबर २०२४ ला MPSC मार्फत झालेल्या परीक्षेत रिव्हनुए assistant पदी निवड झाली तर आता जलसंपदा विभागामार्फत झालेल्या परीक्षेत कॅनल इन्स्पेक्टर पदी निवड झाली आहे. त्यांना गेवराई येथे पदभार देण्यात आला असून त्यांच्या या यशात आई, भाऊ आणि मुलं यांची मोलाची साथ लाभली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोकजी थोरात आणि सर्व कर्मचारी यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### उपळी हायस्कूल मध्ये बालिका दिन साजरा



**उपळी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळी हायस्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री भागवतराव बडे सर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले यावेळी शाळेतील मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषा करून त्यांचे विचार मांडले यावेळी मुलींनी बोलताना म्हणाले की सावित्रीबाई फुले या कालखंडामध्ये शिक्षिका होत्या त्यावेळेस किती हाल अपेक्षा त्यांनी सहन करून आपल्यासारख्या गोरगरीब मुलींना शिक्षण मिळावे यासाठी पुण्यातील भिडे वाड्यामध्ये शाळा काढल्या त्यावेळेस सुद्धा मुली शाळेत जात होत्या आता सुद्धा आपण सर्वजणींनी बाकीचे काम सोडून सतत शाळेत हजर राहणे गरजेचे आहे या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक प्रमुख प्रकाश गोरे सर यांनी केले या कार्यक्रमास शाळेतील सहशिक्षिका श्रीमती सुनिता गायसमुद्र श्रीमती परवीन बाजी शेख श्रीमती प्रज्ञा सौदरमल यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बडे अक्षरा व बडे वैष्णवी शेख आणि घुले आकांक्षा यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

### ज्ञानाई सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेच्या वतीने विनम्र अभिवादन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्त्रीयांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने शैक्षणिक विश्वाचे द्वार उघडून त्यांचे अंधकारमय आयुष्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी खऱ्या अर्थाने प्रकाशमय केल्याची भावना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुलें महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्या पतसंस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतांना बोलत होत्या. यावेळी पतसंस्थेच्या संचालिका श्रीमती शोभा खडकभावी, सुरेखा खंडाळे, सविता रापतवार , अंजली मस्के तसेच उषा मसने या उपस्थित होत्या. कार्यक्रमात सर्वप्रथम ज्ञानाई क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

### वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम ; शालेय साहित्यांचे होणार वाटप

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले जातात. यंदाच्या दर्पण दिनानिमित्त पिंपळटक्का येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना येत्या सहा जानेवारी रोजी शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम जेष्ठ नेते सोमनाथराव बडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असुन उद्घाटक म्हणून गटशिक्षणाधिकारी बी.वाय. उजगरे तर डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,माजी नगरसेवक आत्माराम जमाले,सरपंच संतोष कदम,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या आदेशानुसार प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी काढलेल्या पहिल्या दर्पण या वृत्तपत्राच्या अनुषंगाने दर्पण दिन संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो.

# अंबाजोगाई येथील इस्तेमाच्या समारोप दुवा प्रसंगी धनंजय मुंडेंची उपस्थिती



### मुस्लिम बांधवांशी संवाद साधत दिल्या शुभेच्छा

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई (प्रतिनिधी) - अंबाजोगाई येथे मुस्लिम समाजाच्या इस्तेमाच्या समरोपाच्या दुवाप्रसंगी आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी उपस्थिती लावली.

यावेळी धनंजय मुंडे यांनी समारोपाच्या दुवाप्रसंगी उपस्थित मुस्लिम समाज बांधवांशी तसेच विविध धर्मगुरूंशी संवाद साधत इस्तेमाच्या समारोप प्रसंगाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व मुस्लिम समाजबांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे यांचे केले सांत्वन

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अंबाजोगाई चे तालुकाध्यक्ष राजेभाऊ औताडे यांच्या वडिलांचे नुकतेच दुःखद निधन झाले असून धनंजय मुंडे यांनी सेलू आंबा येथील राजाभाऊ अवताडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन औताडे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, शिवाजीराव शिरसाट, विलास बापू मोरे, विलास काका सोनवणे, अजित गरड, रणजित लोमटे, तानाजी देशमुख, गणेश देशमुख, राजाभाऊ पौळ, प्रवीण जगताप, बंडू शिंदे, शरद शिंदे, रामलिंग चव्हाण, लिंब्राज धुमाळ, धर्मराज पाटील, विठ्ठल कोकरे यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सुरेश हात्ते यांच्या मातोश्रीचां 100 वा वाढदिवस शालेय साहित्य वाटप करून साजरा

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माजी जिल्हा परिषद सदस्य माननीय श्री सुरेश हात्ते साहेब यांच्या आई रुक्मिणीबाई ज्ञानोबा हात्ते यांना शंभर वर्षे पूर्ण झाले सामाजिक उपक्रम राबविले, शालेय विद्यार्थ्यांना खाऊ पेन वाटप करू एडवोकेट सुरेश हत्ती यांच्या आईचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी त्यांचे नातू एडवोकेट अनिल प्रकाश हात्ते यांनी यांच्या निवासस्थानी रुक्मिणीबाई हात्ते यांचा १०० वा वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात कुटुंबांनी वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आले आहे या वेळी मुली, मुले, नातू, पणतु ,सुना, इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*स्त्री शिक्षणाची जननी माता सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त आज विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी भाजप चे जिल्हाअध्यक्ष मा. शंकर भाऊ देशमुख , प्रा. देविदास नागरगोजे , नवनाथ अण्णा शिराळे, अजय सवाई , गणेश भाऊ पुजारी , सुनील मिसाळ , संतोष गवळी ,राजू शहाणे , केशव बडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.*

## ऊसतोड मजुरांच्या समस्या जाणुन घेण्यासाठी कोकण कला संस्थेचा पुढाकार

### आसोला येथे जि प शाळेस भेट

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**



धारुर तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या समस्या व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या अडचणी जाणून घेण्यासाठी कोकण कला व शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद कुबल व त्यांच्या टीमने जिल्हा परिषद असोला शाळेला भेट दिली. ऊस तोड कामगाराचे स्थानीक मुलाशी संपर्क साधून सविस्तर पणे चर्चा केली

कोकण कला व शिक्षण सस्थेच्या पथकाने तालूक्यातील जि प प्राथमीक शाळा आसोला येथे भेट देऊन शाळेतील ऊस तोड कामगाराचे मुलाशी संवाद साधला या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सदाशीव थोरात यांनीसंस्थेचे अध्यक्ष दयानंद कुबल यांचे पारंपरिक बाजरीची भाकरी देऊन स्वागत केले. यावेळी शाळेतील मुले हंगामी वसतिगृहात जेवत असताना कुबल यांनी या संकल्पनेची माहिती घेतली व ऊसतोड मजुरांच्या मुलांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. टीमने घाटेवाडी, कोरेगाव, असोला, गोपाळपूर, सालेगाव या गावांना भेटी देत ऊसतोड मजुरांशी थेट संवाद साधला. त्यांच्या राहणीमान, रोजगाराच्या अडचणी, शिक्षणातील अडथळे यावर चर्चा करण्यात आली. या उपक्रमात युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचे कार्यकारी सचिव एच पी देशमुख, प्रशासनिक - संतोष रेपे, प्रकाश काळे, सुनिता विभूते, संभाजी वळसे आदींचा सहभाग होता.

### वडवणी वकील संघाच्या अध्यक्षपदी अँड. शेख उपाध्यक्षपदी अँड. खताळ व सचिवपदी अँड. उजगरे

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी वकील संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्याने स.ए.न २०२५ साठी नुतन कार्यकारिणीच्या निवडीसाठी निवडणूक घेण्यात आली यामध्ये अध्यक्षपदी प्रथम सहा महिन्यांसाठी अँड.शेख ताजुद्दीन तर दुसर्या सहा महिन्यांसाठी अँड. तुकाराम आडे तर उपाध्यक्षपदी अँड.गजाजन खताळ, सचिव पदि अँड. ऋषिकेश उजगरे यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आलेले आहेत.

वडवणी वकील संघाच्या सन २०२५ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला होता यामध्ये दि.३० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती तर दि.३१ डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अध्यक्षपदासाठी मतदान घेण्यात आले यामध्ये अँड.ताजुद्दीन शेख व अँड. तुकाराम आडे यांना समसमान १५ मते पडली तर एक मतदान बाद ठरविण्यात आले त्यामुळे परत यामध्ये अध्यक्षपदासाठी नाणेफेक करण्यात आली यामध्ये प्रथम सहा महिन्यासाठी ताजुद्दीन शेख तर दुसऱ्या सहा महिन्यासाठी तुकाराम आडे यांची निवड झालेली आहे तर उपाध्यक्षपदी बिनविरोध अँड.गजानन खताळ व सचिवपदी ऋषिकेश उजगरे, कोषाध्यक्षपदि अँड एस.एल.पवार,तर ग्रंथपालपदि अँड ए.एन.काळे यांच्या निवडी झालेल्या आहेत.

## गुरुनानक प्राथमिक विद्यालयात सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सां) संचलित, गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर, बीड येथे सावित्रीमाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार मॅडम होत्या तर प्रमुख मार्गदर्शक डोंगरे मॅडम व मुंडे मॅडम होत्या. या प्रसंगी शाळेतील अनेक विद्यार्थिनींनी सावित्रीमाईची वेशभूषा साकारली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यानंतर विद्यार्थिनींनी पुष्पगुच्छ देऊन सर्व शिक्षकांचे स्वागत केले. कार्यक्रम प्रसंगी चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनीनी सावित्रीमाई फुले यांच्या जीवन व कार्यावर आधारित गीतगायन सादरीकरण केले तसेच अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीमाई याच्या जीवनावर प्रकाश टाकला. यामध्ये गदळे अनुश्री, फाटक यश, विराज पव्हणे, मुळे सिद्धी, श्रीनिवास सोनवणे, प्रथमेश राऊत, गदळे अनुष, समर्थ शहाणे, कार्तिक राठोड, यांनी आपापली मनोगत केली. शाळेच्या सहशिक्षिका डोंगरे मॅडम आणि मुंडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार मॅडम यांनी अध्यक्षीय भाषणांनी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री तांदळे सर तर आभार प्रदर्शन श्री गदळे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पव्हणे मॅडम, तेलप सर, ठोकरे सर यांनी सहकार्य केले.

## धारूर एस टी आगाराचे सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार सेवानिवृत्ती निमीत्त सोहळा संपन्न

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**




धारूर एस टी आगाराचे सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार हे ३५ वर्षाचे प्रदीर्घ सेवे नंतर सेवानिवृत्त होत असल्या बद्दल धारूर आगाराचे वतीने सफत्नीक सत्कार करून त्याना सन्मान पुर्वक निरोप देण्यात आला यावेळी त्यांचे सेवा काळातील कार्याचा गौरव सर्वानी केला. धारूर एस टी आगाराचे सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार याचे ३५ वर्षाचे प्रदीर्घ सेवे नंतर सेवानिवृत्त होत अल्या बद्दल धारूर आगार व कर्मचा-याचे वतीने सन्मान पुर्वक निरोप देण्यात आला

या कायक्रमाचे अध्यक्षस्थानी आगार प्रमूख नवनाथ चौरे हे होते तर प्रमूख पाहुणे म्हणुण बीड विभागाचे यंत्र अभियंता कांडगिरे, उपयंत्र अभियंता अमोल भुसारी विभागीय भांडार अधिक्षक पाटोळे, माजी नगरसेवक राजु कोमटवार हे उपस्थीत होते. भारत कोमटवार यांचा धारूर आगार व कर्मचा-याचे वतीने सपत्नीक सत्कार करून त्याचे ३५ वर्षा चे उत्कृष्ट व प्रामाणीक सेवेचा गौरव सर्वच वक्तयानी केला. भारत कोमटवार यानी सत्काराला उत्तर देताना प्रामाणीक पणे सेवा कशी केली आलेले विवीध अनुभव सागीतले. सर्वाचेच आपल्याला सहकार्य मिळाल्याने आपण उत्कृष्ट सेवा करू शकलो हे सांगीतले. यावेळी अध्यक्षीय भाषणात आगारप्रमूख नवनाथ चौरे यानी दिडवर्षा पासून कोमटवार याचे सोबत काम करताना आपले काम प्रामाणीकपणे केले तर माणूस कामात यशस्वी कसा होऊ शकतो हे शिकायला मिळते असे सागून त्याचे कार्याचे कौतूक केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी बिक्कड व मुंडे यांनी केले तर अभार आशोक मुळे यांनी केलेया वेळी मित्र परीवार नातेवाईक. यांच्या सह आगारातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी अजय सोनटक्के, बाळासाहेब सुतार, विजय चॉव्हाण, इम्रान कादरी, विनोद बरके, बालासाहेब ठोंबरे, राजमाने, व इतर कर्मचारी यानी परीश्रम घेतले

## तुलसी शैक्षणिक समूहात एकपात्री नाट्यातून सवित्रीमाईंचे जीवनदर्शन

### विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ५ महिलांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी शैक्षणिक समूह, बीड.च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त शनिवार दि.४ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वा.तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड. येथे महाविद्यालयाच्या प्रांगणात स्त्री सन्मान सोहळा व मी सावित्री बोलतेय या एकपात्री विचारनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष,मा. प्रा.प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शक व एकपात्री नाट्याच्या सादरकर्त्या एस. एन. डी. टी. महिला महाविद्यालय, जळगाव च्या प्रा. मीनाक्षी वाघमारे उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी कला



व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. विनोद किर्दक, समर्थ राजयोग चे संपादक, मा. वैभव स्वामी, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा, दीपाताई रोडे, सामाजिक कार्यकर्त्या वाघमारे ताई सह आदींची उपस्थिती होती.

या वेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला कर्तुत्वांचा सन्मान करताना प्रा.कल्याणी राजेश शिंदे (चित्रपट व फोटोग्राफी), भावना बिडवे (सौंदर्य प्रसाधन), मा. प्रज्ञा दीपक जमधाडे ( लॅक्मे- प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट, बीड. ), कु.अंकिता जाधव( फॅशन डिझायनर),मा. शेख आयेशा ( पत्रकारिता ) यांना सन्मानचिन्ह, धम्म सेवक लक्ष्मणराव रोडे गुरुजी ग्रंथ व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. मी सावित्री बोलतेय या एकपात्री विचारनाट्य प्रयोगाच्या सादरीकरणातून प्रा.मीनाक्षी वाघमारे यांनी सावित्रीमाईचे बालपण ते मृत्यूपर्यंतचा संपूर्ण संघर्षमय जीवनपट दर्शविला.

